विषय : मराठी
इयत्ता : 10 वी (E.M)

# Prelim Answer Paper - 1

एकूण गुण : 80

## विभाग 1 : गद्य विभाग

**प्र.1 अ.खालील उताऱ्यांच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **2**

**1) जोड्या लावा**

**उत्तर:**

| 'अ' गट | उत्तर |
|---|---|
| 1.ज्ञानपीठ पुरस्कार | इ. विशाखा काव्यसंग्रह |
| 2.कवीवर्य कुसुमाग्रज | ड. वि.वा.शिरवाडकर |
| 3.नाटक | ब. चुरचुरीत संवाद |
| 4. चरित्र | क. सामान्यांना प्रेरणा |

कविता : 'नटसम्राट'नाटकाचे.........
..............ना प्रेरणा देतात म्हणून.

**2 i) सहसंबंध लक्षात घेऊन वाक्य पूर्ण करा.** **1**

**नाटकाचं रंगमंचावर सादरीकरण होणार आहे याचे..........**

**उत्तर:** नाटकाचं रंगमंचावर सादरीकरण होणार आहे याचे **भान ठेवूनच नाटककार माझी मांडणी करतो.**

**ii) विधान पूर्ण करा.** **1**

**पात्ररचना, चुरचुरीत संवाद आणि नाट्यमय घटना प्रसंग यांमुळे मी.....**

**उत्तर:** पात्ररचना, चुरचुरीत संवाद आणि नाट्यमय घटना प्रसंग यांमुळे मी **मराठी माणसाच्या हृदयात अढळ स्थान प्राप्त करतो.**

**3) स्वमत** **3**

**पुस्तकाशी मैत्री करण्याचे फायदे लिहा.**

**उत्तर:** पुस्तकासारखा मित्र जगात कुणी नाही. पुस्तकांशी मैत्री म्हणजे आपले जीवन समृध्द करणे. पुस्तके नि:स्वार्थी असतात. ती आपल्याकडून कोणतीही अपेक्षा करीत नाहीत. जेव्हा हवी असतील तेव्हा ती वाचनासाठी उपलब्ध असतात. त्यांना आपण कुठेही आपल्या संगती नेऊ शकतो. ती कोणतीही तक्रार करीत नाहीत किंवा कोणताही हट्ट धरत नाहीत. पुस्तकामुळे आपल्याला ज्ञान व माहिती मिळते. पुस्तकामुळे आपले मनोरंजन होते. पुस्तके आपल्याला चांगली शिकवण देतात.

देशोदेशी सफर घडवून आणतात. पुस्तकांमुळे आपल्या जीवनात आनंद येतो. पुस्तकांमुळे आपल्यावर चांगले संस्कार होऊन आपले जीवन समृध्द व सुखकर होते. म्हणून पुस्तकांशी घट्ट व अतुट मैत्री करावी.

**(आ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**1) आकृती पूर्ण करा.** **2**

**उत्तर:**

परीक्षा बुडल्याचा निरंजनवर होणारा परिणाम
- नापास होणार
- शिक्षण बंद
- भडसावळे गुरूजींची मदत बंद
- रेल्वेनं फिरायचं स्वप्न अपुरे राहणार

रात्री दोन वाजता शेवटची......
........ नेमकी जागा दाखवली.

**2 i) वाक्य पूर्ण करा.** **1**

**नऊ पन्नासची गाडी नुकतीच आली होती तेव्हा-....**

**उत्तर:** नऊ पन्नासची गाडी नुकतीचा आली होती तेव्हा-

**निरंजन स्टेशनात शिरला होता.**

**ii) चौकटी पूर्ण करा** 1

**उत्तरः** १) निरंजनने धावत जाऊन यांना गाठले. - **स्टेशनमास्तरांना**

**उत्तरः** २) निरंजन खोटे बोलला तर यांच्या ताब्यात देणार - **पोलिसांच्या**

**3) स्वमत** 3

**तुम्हाला निरंजनशी मैत्री करायला आवडेल का व त्यांची कारणे लिहा.**

**उत्तरः** मला निरंजनशी मैत्री करायला आवडेल. कारण निरंजन हा प्रामाणिक व कष्टाळू मुलगा आहे. प्रसंगावधान ओळखून त्याने शेकडो प्रवाशांचे जीव वाचवले. स्वत:च्या भविष्याची चिंता न करता निस्वार्थी भावनेने त्याने प्रयत्न करून भयंकर घटना होण्यापासून वाचवले.

### अपठित गद्य

**(इ) उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**1) एका वाक्यात उत्तरे लिहा.** 2

**1) लेखिका अनेकदा या विवंचनेत असे**

**उत्तरः** i) संसाराच्या

ii) पोराटोरांच्या

**2) लेखिकेचे मन कवितेची प्रतिक्रिया देताना म्हणतात असे.**

**उत्तरः** i) तू अडाणी बाई

ii) हसं करून घेशील

> चिंचपोकळीला आल्यानंतर.....
> ......उत्तराची अपेक्षा करीत नसत.

**2 i) योग्य पर्याय निवडा** 1

**कविता ऐकल्यानंतरही मास्तर लेखिकेकडून अपेक्षा करत नसत-**

**उत्तरः** अ) प्रतिक्रियेची

**ii) खालील शब्दसमूहांचा तुम्हाला कळलेला अर्थ लिहा.** 1

**मत, अभिप्राय या साठी उताऱ्यात आलेला शब्द**

**उत्तरः** प्रतिक्रिया

### विभाग 2 पद्य

**प्र 2 (अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**1 i) कवितेच्या आधारे खालील कृती केव्हा घडतात ते लिहा.** 1

**उत्तरः** १) माता धावून जाते-

**जेव्हा बाळ अग्नित पडते**

२) पृथ्वीवर पक्षीण झेपावते-

**जेव्हा तिचे पिल्लू धरणीवर पडते**

**ii) आकृती पूर्ण करा.** 1

कवितेत आलेले प्राणी

- **गाय(धेनू)**
- **हरीण**

> अग्निमाजि पडे बाळू । माता .....
> .....विनवितो चातक तैसा॥६॥

**2) जोड्या लावा** 2

**उत्तरः**

| अ- गट | उत्तर |
|---|---|
| **i)** धेनू | क. वासरू |
| **ii)** हरीण | ड. पाडस |
| **iii)** चातक | ब. मेघ |
| **iv)** आई | अ. बाळ |

**3) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा** 2

**उत्तरः** i) अंकिला - **अंकित झालेला**

ii) सवेंचि - **लगेच**

iii) धरणीं - **जमीन**

iv) वत्सरावें - **वासराचा आवाज**

**4) काव्यसौंदर्य** 2

**अग्निमाजि पडे बाळू । माता धांवें कनवाळू । तैसा धांवे माझिया काजा । अंकिला मी दास तुझा या काव्यपंक्तीतील तुम्हाला समजलेला विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.**

**उत्तरः** अंकिला मी दास तुझा हा अभंग कवीसंत नामदेवांनी लिहीला आहे. कवीने स्वत:ला परमेश्वराला स्वाधीन करून दिले आहे. परमेश्वराला

विनवणी करत आहे. दास म्हणून स्वीकार कर. संत नामदेव सांगतात, आगीत पडलेल्या लहान बाळाला बाहेर काढण्यासाठी जशी दयाळू माता धावत जाते. तसाच मला माझ्या कार्यात मदत करण्यासाठी हे परमेश्वरा तू धावून ये. माझा दास म्हणून स्वीकार कर. संत नामदेवांनी आई व बाळाचे उदाहरण देऊन परमेश्वराला विनंती केली आहे.

**(आ) कवितेसंबंधी खालील मुद्द्यांच्या आधारे संतवाणी संबंधी कृती सोडवा** **8**

**1) प्रस्तुत संतवाणीचे रचनाकार.** **1**

**उत्तर:** संत नामदेव या संतवाणीचे रचनाकार आहेत.

**2) संतवाणीचा विषय.** **1**

**उत्तर:** परमेश्वर कृपेची याचना, भक्ती येथे व्यक्त होते.

**3) खालील ओळींचा सरळ अर्थ लिहा.** **2**

**अ) अग्निमाजि पडे बाळू ।**
**माता धांवें कनवाळू ।।**

**उत्तर:** अग्नीमध्ये बाळ पडले तर माता धावून जाते.

**ब) तैसा धांवें माझिया काजा।**
**अंकिला मी दास तुझा**

**उत्तर:** ज्या प्रमाणे आई मुलांसाठी धावते त्याचप्रमाणे परमेश्वर माझ्यासाठी (कामासाठी) धावतो. म्हणून मी तुझा अंकित आहे.

**4) संतवाणीतून मिळणारा संदेश.** **2**

**उत्तर:** संत नामदेवांनी विठ्ठलाला आई म्हटले आहे. आई बाळाचा सांभाळ करते त्याप्रमाणे विठ्ठलानेही आपला सांभाळ बाळाप्रमाणे करावा. अशी विनंती केली आहे. ज्याप्रमाणे बाळ पूर्णपणे आईवर अवलंबून असते, त्याचप्रमाणे आपण ही देवाच्या चरणी नतमस्तक व्हावे म्हणजे तो आईप्रमाणे आपला सांभाळ करेल, असा विश्वास संत नामदेव या अभंगातून व्यक्त करतात. या अभंगातून भक्ती करण्याचा मार्ग त्यांनी अतिशय सोप्या भाषेत सांगितलेला आहे.

**5) संतवाणी आवडण्याची वा न आवडण्याची कारणे.** **2**

**उत्तर:** या अभंगात संत नामदेवांनी विठ्ठलाला आई म्हटले आहे. या अंभगातून अनेक दृष्टांत दिले आहेत यातून मला भक्ती करण्याचा मार्ग मिळाला याशिवाय अभंग वाचताना मला माझ्या आईची आठवण झाली. आई ज्याप्रमाणे आपल्याला जपते त्याप्रमाणे देवानेही आपल्यावर आईप्रमाणे माया करावी, आपल्याला जपावे हा विचार मनाला अतिशय भावला. या अभंगाची रचना अतिशय सोपी साधी असल्यामुळे अभंगाचा अर्थ सहजपणे समजतो.

**किंवा**

**हिरवंगार झाडासारखं या कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.**

**1) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री** **1**

**उत्तर:** जॉर्ज पॉलीस

**2) कवितेचा विषय.** **1**

**उत्तर:** निसर्गातील झाडांसारखे आपणही जीवनात आनंदी राहिले पाहिजे.

**3) खालील ओळींचा अर्थ स्पष्ट करा.** **2**

**झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर**
**अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब.**

**उत्तर:** हिरव्यागार झाडांसारखं या कवितेत कवी जॉर्ज पॉलीस यांनी झाडाची सहकासीच्या वृत्तीचे वर्णन करताना सांगितले आहे की झाड निर्मितीक्षम असते. पहाटे पहाटे झाडाच्या पानावर दवांचे टपोरे थेंब निर्माण होतात. दवाच्या टपोऱ्या थेंबाच्या निर्मितीचे रहस्य कलाकाराने जाणले, तर त्याच्याही वहीच्या कागदावर ते टपोरे थेंब अलगद उतरतात त्याच्याकडून नवनिर्मिती होते.

**4) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे** **2**

**उत्तर:** जॉर्ज पॉलीस यांची हिरव्यागार झाडासारखं ही कविता फार आवडली कारण झाडाचे महत्त्व व झालाचे गुणवैशिष्ट्य कवींनी सोप्या भाषेत व्यक्त केले आहेत. मानवाला झाडासारखे व्हावे ही कल्पना फार सुंदर आहे.

**5) कवितेतून मिळणारा संदेश** **2**

**उत्तर:** झाडासारखे नि:स्वार्थपणे मानवता आयुष्य जगण्यासाठी कवीने सूचित केले आहे. झाड निर्दयपणे तोडणाऱ्या माणसांलाही तो दु:खवत नाही आपणही कोणाही त्रास न देता दुसऱ्यांना सुख देऊन आनंदात आयुष्य जगावे हा संदेश कवितेतून मिळतो.

## विभाग 3 - स्थूलवाचन

**प्र.3 खालील कोणत्याही दोन कृती सोडवा. 6**

**1) 'सूर्य ऊर्जेचा स्त्रोत' या विषयावर जाता अस्ताला या कवितेच्या आधारे लिहा.**

**उत्तर:** सूर्याची ऊर्जा ही नैसर्गिक स्त्रोत आहे. पृथ्वीवरील प्रत्येक सजीवाला ऊर्जेची आवश्यकता असते. सूर्याची ऊर्जा प्रखर असते. प्रत्येक जीवाचे अस्तिव हे सूर्याच्या ऊर्जेनेच टिकून असते. जस सूर्याची ऊर्जा पृथ्वीला मिळाली नाही तर सर्व जीवांचे अस्तित्व धोक्यात येईल. सूर्य नसेल तर पृथ्वीवरील जीवन सुरळीत राहणार नाही. म्हणून चिंता वाटणे स्वाभाविक आहे.

**2) थोड्याशा पाण्यावर कसे वाढावे याचा नमुना म्हणजे कॅक्टस! या विधानाची यथार्थता लिहा.**

**उत्तर:** वाळवंटी प्रदेश म्हणजे ठणठणीत कोरडेपणा, पाण्याचे दुर्भिक्ष आणि रेताड जमीन अशा जमिनीत पाऊस आला की उगवायचे आणि पाऊस संपून कोरडा हंगाम आला, की बियांच्या रुपाने मातीत पडून राहायचे हा जो वर्णन केलेला वनस्पतीचा प्रकार आहे. तो अवर्षण टाळणारा आहे. वाळवंटी प्रदेशात उगवणाऱ्या वनस्पतींचा आणखी एक प्रकार आहे, तो अवर्षणाचा प्रतिकार करणारा आहे. या वनस्पती पाऊस पडतो तेव्हा जे काय पाणी मिळवता येईल तेवढे स्वत:मध्ये साठवून ठेवतात आणि कोरड्या हंगामात अगदी मंद गतीने वाढत राहतात. अवर्षणाचा प्रतिकार करणाऱ्या या वनस्पतींमध्ये सर्वांत महत्त्वाचं कॅक्टस.

**3) सूर्यास्ताच्या दर्शनाने मनात निर्माण होणाऱ्या मानवी भावभावना स्पष्ट करा.**

**उत्तर:** सूर्यास्ताच्या दर्शना वेळी मनात भीतीचे वातावरण निर्माण होते. सूर्योदयाने प्रकाशित झालेली पृथ्वी आता अंधारात जाणार सगळीकडे होणारा पक्ष्यांचा व मानवाचा गलगलाट शांत होणार या विचाराने मन अस्वस्थ होते. तेजस्वी सूर्य लालबुंद होऊन ढगांच्या मागे लपायला लागतो मग रात्रीचा खेळ सुरू होतो. हा अंधार सगळयांना गिळून टाकेल, नष्ट करेल अशी चिंता मनाला राहते.

## विभाग 4 - भाषाअभ्यास

**प्र 4 (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.**

**1) वाक्यांचे प्रकार ओळखा 2**

**i) उत्तम नागरिक कोणाला म्हणतात?**

**उत्तर:** प्रश्नार्थी वाक्य

**ii) चिठ्ठीतला मजकूर ऐकून अब्दुल आणि शत्रूला खूप आनंद झाला.**

**उत्तर:** विधानार्थी वाक्य

**2) वाक्यरूपांतर - 2**

i) **भाजी शिळी नाही. (होकारार्थी वाक्य करा)**

**उत्तर:** भाजी ताजी आहे.

ii) **पांढरा रंग सगळ्यांना आवडतो.(प्रश्नार्थी करा)**

**उत्तर:** कोणता रंग सगळ्यांना आवडतो.

**3) खालील वाक्यप्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा. (फक्त दोन) 4**

**1) अंगाचा तिळपापड होणे -**

**उत्तर:** संताप होणे.

**वाक्य -** चुकीच्या निर्णयामुळे खेळाडू बाद झाल्यावर त्याच्या अंगाचा तिळपापड झाला.

**2) वर्ज्य करणे -**

**उत्तर:** न घेणे, कमी करणे

**वाक्य -** वजन कमी करण्यासाठी भात वर्ज्य करावा लागेल.

**3) हातभार लावणे -**

**उत्तर:** मदत करणे.

**वाक्य -** संयोगिता आईला कामात हातभार लावत असते.

**आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**

**शब्दसंपत्ती -**

**१) लिंग बदला 1**

**उत्तर:** i) मोर - **लांडोर**

ii) मित्र - **मैत्रीण**

**२) विरूध्दार्थी शब्द लिहा. 1**

**उत्तर:** i) आशा × **निराशा**

ii) गुण × **अवगुण**

**३) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा. 1**

**उत्तर:** i) मूर्तीची पूजा करणारा - **पुजारी**

ii) सूर्याचा होणारा उदय - **सूर्योदय**

**४) वचन बदला.**

**उत्तर:** i) चूल - **चुली**

ii) चेहरा - **चेहरे**

**2) लेखननियमांनुसार लेखन -** **2**

**लेखननियमांनुसर बदल करा.**

**1) दोन महीन्यात पन्नास पौंड वजन कमी करेन**

**उत्तर:** दोन <u>महिन्यात</u> पन्नास <u>पौंड</u> वजन कमी करेन

**2) बीचारा अतिप्रामानिक!**

**उत्तर:** बिचारा अतिप्रामाणिक!

**3) विरामचिन्हे -** **2**

**1) चुकीची विरामचिन्हे बदला**

**किती, सुंदर गाव आहे हे ?**

**उत्तर:** किती सुंदर गाव आहे हे !

**2) विरामचिन्हांचा योग्य वापर करा.**

**तुला सांगतो मी पंत 'डाएट कर' बटाटा सोड बटाट्याचं नाव काढू नकोस**

**उत्तर:** ''तुला सांगतो मी पंत 'डाएट कर' बटाटा सोड बटाट्याचं नाव काढू नकोस.''

## विभाग 5 - उपयोजित लेखन

**प्र. 5 (अ) 1. पत्रलेखन -** **6**

**खालील विषयावर पत्र लिहा.**

**'जागतिक आरोग्य दिन'**
**'डास निर्मूलन मोहीम'**
या उपक्रमात सहभागी व्हा
**संपर्क-** आरोग्याधिकारी महानगरपालिका, मुंबई

नागरिकांना आवाहन-आपल्या परिसरात कचराकुंड्या स्वच्छ नसतील तर तेथील रहिवाशांनी आरोग्याधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

**नगरसेविका या नात्याने**

(अ) कचराकुंड्या व परिसर नियमित स्वच्छ करण्यासाठी महानगरपालिकेला विनंती पत्र लिहा.

(ब) महानगरपालिकेकडे डास निर्मूलन करण्यासाठी मच्छरविरोधी फवारणीची मागणी करणारे पत्र लिहा.

**अ) कचराकुंड्या व परिसर नियमित स्वच्छ करण्यासाठी महानगरपालिकेला विनंती पत्र लिहा.**

**उत्तर:** दिनांक : ७ एप्रिल, २०२३

प्रति,

आरोग्याधिकारी,

महानगरपालिका,

भांडुप - ४०००७९

**विषय:** कचराकुंड्या नियमित स्वच्छ करण्याविषयी विनंती पत्र.

माननीय महोदय,

मी नलिनी सावंत, भांडुप येथील एक रहिवासी (नगरसेविका) आहे. जागतिक आरोग्य दिनानिमित्त 'डास निर्मूलन मोहीम' हा उपक्रम आपण राबवत आहात व तो अतिशय स्तुत्य उपक्रम आहे. या उपक्रमांअंतर्गत एका आवश्यक गोष्टीकडे आपले लक्ष वेधू इच्छिते.

आमच्या विभागात महात्मा गांधी मार्गाच्या मध्यावरच कचरा टाकण्यासाठी चार मोठया कचराकुंड्या ठेवलेल्या आहेत. गेल्या आठ दिवसांपासून कचरा नेण्याची व्यवस्था झालेली नाही. जर हे लवकर स्वच्छ नाही केले तर कचरा कुजून कुजलेल्या कचऱ्याची दुर्गंधी परिसरात पसरेल.

तसेच या कचराकुंड्या कचऱ्याने भरल्या असल्याने कचरा रस्त्यावर पसरलेला आहे. त्यामुळे परिसरात माशा व डासांचे प्रमाण बरेच वाढले आहे. याचा परिणाम म्हणून विभागातील बरीच माणसे मलेरियाने आजारी आहेत. म्हणून आपण या पत्राकडे विशेष लक्ष दिल्यास परिसर स्वच्छ होण्यास मदत होईल.

आपली कृपाभिलाषी,

नलिनी सावंत (नगरसेविका)

२/२५, साईकृपा बिल्डिंग,

महात्मा गांधी मार्ग,

भांडुप - ४०००७८

ई-मेल आयडी - sawantnalini@gmail.com

**ब) महानगरपालिकेडे डास निर्मूलन करण्यासाठी मच्छरविरोधी फवारणीची मागणी करणारे पत्र लिहा.**

**उत्तर:** दिनांक : ७ एप्रिल, २०२३

आरोग्याधिकारी,

महानगरपालिका,

भांडुप - ४०००७९

**विषय:** 'डास निर्मूलन' करण्यासाठी मच्छरविरोधी फवारणीची मागणी करणारे पत्र.

माननीय महोदय,

मी नलिनी सावंत, भांडुप येथील एक रहिवासी (नगरसेविका) आहे. आपण 'डास निर्मूलन मोहीम' हा उपक्रम राबवत आहात त्याचे आम्ही रहिवासी स्वागत करतो; पण आपण विभागातील कचराकुंड्यांची साफसफाई वेळोवेळी होत नाही. त्यामुळे डासांचे प्रमाण वाढले आहे. म्हणून परिसरात मलेरिया व डेंग्यूची साथ पसरली आहे. तेव्हा येथे आपल्या उपक्रमाअंतर्गत 'डास निर्मूलन' फवारणीची व्यवस्था करावी.

कृपया लवकरात लवकर आमची या त्रासातून मुक्तता करावी व आमच्या आरोग्याचे रक्षण करावे.

आपली नम्र,

नलिनी सावंत (नगरसेविका),

२/२५ साईकृपा बिल्डिंग,

महात्मा गांधी मार्ग,

भांडुप - ४०००७८

ई-मेल आयडी - sawantnalini@gmail.com

**किंवा**

**2. सारांशलेखन -**


**विभाग 1 - गद्य प्र.1 (इ) उतारा वाचा व त्याचा एक तृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

**उत्तर:** मराठी वाङमय खूप विस्तारित स्वरूपात आहे. त्यातील कविता हा प्रकार सर्वांच्याच आवडीचा मास्तरांचा 'माझे विद्यापीठ प्रसिध्द' हा काव्यसंग्रह प्रसिध्द झाला. या गोष्टीचे विशेष महत्त्व यामुळे की, मास्तर उच्चशिक्षित नव्हते. मास्तरांच्या कवितेची तारिफ करणे त्यांना जमायचे नाही कारण, कवितेच्या बाबतीतले तिला काहीही समजायचे नाही. त्यामुळे कवितेबद्दलचे मत मास्तरही कधी विचारायचे नाही.

**आ) खालीलपैकी कोणत्याही दोन क्रृति करा. 10**

**1. जाहिरातलेखन (60 ते 80 शब्द)**

**खालील शब्दांचा आधार घेऊन आकर्षक जाहिरात तयार करा.**




**उत्तर:**




**2. कथा लेखन (80 ते 100 शब्द)**

**खालील अपूर्ण कथा वाचा, तुमचा विचार व कल्पकतेने ती कथा पूर्ण करा.**

**(दिलेली अपूर्ण कथा लिहून घेण्याची आवश्यकता नाही.)**

| |
|---|
| कुरणगावात घडलेली ही ..... .......हिरमुसले होउन जायचे. |

**उत्तर:** एक दिवस गजधर बकऱ्यांनां घेऊन शेतात गेला. बकऱ्या शेतात चरत होत्या व गजधर झाडावर शांत बसलेला होता. अचानक त्याने पहिले की, एक लांडगा दूरवरून त्याच्या चरणाऱ्या बकऱ्याकडे पहात होता आणि क्षणार्धात त्या लांडग्याने गजधराच्या बकऱ्यांवर हल्ला केला व तो त्याच्या बकऱ्यांचा फडशा पाडू लागला. हे सर्व दृश्य पाहून गजधर मोठ मोठ्यांनी मदतीसाठी लोकांना ओरडू लागला

पण त्याच्या खोडकर वृत्तीला कंटाळलेले लोक तो खोडकरपणा करतोय असे समजून त्याची मदत करायला आले नाही आणि अशाप्रकारे त्या लांडग्याने गजधराच्या सर्व बकऱ्यांना मारले व निघून गेला. आता मात्र गजधर हतबल होऊन रडू लागला व त्याला त्याच्या वागण्याचा पश्चाताप झाला.

**3) बातमी लेखन (80 ते 100 शब्द)**
**खालील समारंभाची बातमी तयार करा.**
**शाळेच्या सुवर्ण महोत्सवाचा उद्‌घाटन समारंभ माननीय शिक्षणमंत्री यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.**

**उत्तर:** सन्मित्र विद्यालयाचा सुवर्ण महोत्सव उद्‌घाटन समारंभ थाटात साजरा

आमच्या वार्ताहराकडून,

दिनांक १५ डिसेंबर

बाणगंगा येथील सन्मित्र विद्यालयाचे २०२१-२२ हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. या निमित्ताने मा. शिक्षणमंत्री सुमती राजाध्यक्ष यांच्या उपस्थितीत उद्‌घाटन समारंभ संपन्न झाला. मा. शिक्षणमंत्री सुमती राजाध्यक्ष यांच्यासह बाणगंगा येथील आमदार अच्युत पाटील व स्थानिक नगरसेवक रमा देसाई उपस्थित होते.

उपस्थितांपैकी मान्यवर आणि विद्यार्थी प्रतिनिधींनी आपआपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाची सुरूवात स्वागत गीताने झाली आणि त्यानंतर स्थानिक आमदार नगरसेवक यांनी शाळेने आयोजित केलेल्या कार्यक्रमाची प्रंशसा केली आणि शाळेला लागणारी परवानगी आणि आवश्यक ती मदत आम्ही करू असे जाहीर केले. शिक्षणमंत्र्यांनी शासनाकडून मदत करण्याचे आश्वासन दिले.

शाळेच्या मुख्याध्यापकांनी सर्वांचे आभार मानले आणि सर्वांनी वर्षभर होणाऱ्या कार्यक्रमात उपस्थित राहून कार्यक्रम साजरा करावा अशी विनंती केली.

**इ) लेखनकौशल्य** **8**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणत्याही एक कृती सोडवा. (शब्दमर्यादा 100 ते 120 शब्द)**

१)

**अश्वमेध सभागृह**

**दिव्यांग मुलांनी तयार केलेल्या कलात्मक वस्तूंचे प्रदर्शन**

दि. १५ डिसेंबर ■ वेळ-सं.१० ते रा.८

**प्रमुख पाहुणे - श्रीमती कला परांजपे**

*३५ दिव्यांग व्यक्तींनी तयार केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती पाहण्याची संधी*

**वरील प्रदर्शन पाहण्यासाठी तुम्ही गेला होतात, अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.**

**उत्तर:** पुणे येथील अश्वमेघ सभागृहात दिनांक १५ डिसेंबर, मंगळवारी दिव्यांग मुलांनी तयार केलेल्या कलात्मक वस्तुचे प्रदर्शन झाले. वेळ सं १० ते रात्री ८ पर्यंत होती. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन प्रमुख पाहुणे श्रीमती कला परांजपे यांच्या हस्ते झाले. ज्यामध्ये त्यांनी ३५ दिव्यांग मुलांनी तयार केलेल्य वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती पाहण्याची संधी मिळाली.

हे प्रदर्शन १५ ते २५ डिसेंबर पर्यंत सर्वांसाठी खुले राहील. ज्यामध्ये आपण निसर्गावर व आलेल्या परिस्थितीवर मात देऊन काहीतरी मिळवण्याच्या धडपडीवर काम करण्याचे कौतुक करणार आहोत व त्यांना आर्थिक निधी उभी करणार आहोत. हे प्रदर्शन पाहून माझे डोळे दिपून गेले. कला देतात व उपजत असताना निसर्ग माणसाची नव्हे तर त्याच्या गुणांची निवड करत असतो हे मात्र मी जाणून घेतले.

**2) खालील मुद्दे विचारात घेऊन 'देशभक्ताच्या पत्नीचे आत्मकथन' या विषयावर आत्मकथनात्मक निबंध लिहा.**

**मुद्दे : बालपण - वैवाहिक जीवन- सासू-सासरे, पती यांचा स्वभाव- धैर्याने तोंड देणे- स्वातंत्र्यलढा- सन्मान- जीवनातील सार्थकता.**

**उत्तर:** "देशस्वातंत्र्यासाठी समर्पण करणाऱ्या बापूंना आपले जीवन वनवास वाटले नाही. तसेच मलासुध्दा हे जीवन कधीच वनवास वाटले नाही. माझे जीवन खरोखर धन्य आहे. मी आज कस्तुरबा गांधी तुमच्याशी बोलणार आहे.

माझे बालपण गुजरातमधील एका सधन परिवारातले. आमच्या काळात शालेय शिक्षणाला महत्व नव्हते. त्यावेळी बालविवाह होत असल्याने माझे लग्न वयाच्या ७ व्या वर्षी गांधीजींबरोबर

झाले. माझा स्वभाव पहिल्यापासूनच शांत होता. माझे सासू-सासरे देवासारखी माणसे होती. कित्येक दिवसांपर्यंत मला माझ्या पतीशीही बोललेले आठवत नाही. दोन वेळचा स्वयंपाक बनविणे आणि सासूने सांगितलेली कामे करणे इतकाच माझा दिनक्रम असे. मला माझे माहेर, येथील मैत्रिणी आठवत. गांधीजी सतत अभ्यासात गर्क असत. ते परदेशी जाण्याची बातमी माझ्या कानी येऊ लागली. शेवटी वकिलीचा अभ्यास करायला आफ्रिकेला गेले.

आफ्रिकेला जाऊन आल्यावर गांधीजी संपूर्णपणे बदलले होते. इंग्रजांविरूध्द त्यांनी लढा पुकारला. इंग्रजांची कडक नजर त्यांच्यावर होती. गांधीजींना तुरूंगवास खूप वेळा भोगावा लागला. पुण्यातील आगाखान पॅलेसमधील बंदिवास फार त्रासाचा होता. सत्याग्रह आणि अहिंसा ही त्यांची दोन शस्त्र होती. गांधीजींच्या या सन्मानाबरोबर मी राष्ट्रमाता झाले मी स्वत:ला धन्य मानतो गांधीजींच्या जीवनात त्यांची पत्नी म्हूणन आल्याबद्दल! जगाने मला मानले ते त्यांच्या पुण्याईमुळे. आमच्या परिवारात सर्वजण मला मान देत असत.

एका देशभक्ताची पत्नी म्हणून मला घर-संसार व येणाऱ्यांची वर्दळ, त्यांचे स्वागत करणे माझे एवढेच काम होते: परंतु गांधीजी हे सक्रिय देशभक्त होते. त्यांना भेटायला येणारे कार्यकर्ते मलाही त्यांच्याबरोबर सन्मान द्यायचे. मला खूप सन्मान मिळायला. त्यावेळेस मला गांधीजींनी देशासाठी केलेले काम याची आठवण यायची व ऊर अभिमानाने भरून यायचा. म्हणून मी देवाकडे प्रार्थना करते की, देवा मला प्रत्येक जन्मात देशभक्त गांधीजींची पत्नी होण्याचे भाग्य दे.''

**3) यंत्र- आमचा मित्र की शत्रू?**

**मुद्दे : यंत्रचा उपयोग अटळ- दोन्ही बाजूंनी भिन्न विचारसरणी- यंत्राचा शोध लागल्याने बेकारी वाढली- अपघातांचे खरे कारण- उत्पादने वाढले- यंत्र आमचा मित्रच- विकास होतो- नव्या युगात यंत्रशक्ती महत्त्वाची- क्षमता- उपयोग कसा करावा आपल्या हाती- चांगल्यासाठीच उपयोग, मित्र-नाशासाठी उपयोग-शत्रू.**

**उत्तर:** माणसाला ज्ञान मिळाले आणि त्याने विस्मयजनक प्रगती करण्यास सुरूवात केली. अनेक प्रकारच्या यंत्रांचा शोध लावून आज मनुष्यजीवन सर्व प्रकारांनी सोयीचे झाले आहे. इतकेच नव्हे तर शोधू लावून रोगराईवर नियंत्रण करून माणसांची जीवनमर्यादाही वाढली आहे.

आज यंत्र ही प्रत्येक परिवारात आवश्यक अशी बाब आहे. उकाड्यापासून आराम म्हणून पंखे हवेत, करमणुकीसाठी टीव्ही हवा सामान्यातील सामान्य परिवारही यंत्रांचे महत्व जाणतो. आपले जीवन सुखावह करण्याचा प्रयत्न करतो. विलासी जीवनात यंत्राने फार मोठे स्थान मिळविले आहे. कारखाने, कार्यालये, वाहतुकीची साधने यातील यंत्रांची करामत पाहिली की मन थक्क होते. संगणकाने तर माणसाच्या विद्वत्तेची साक्ष पटवली आहे. प्रगतीचा उच्चांक गाठल्याचेच जणू सांगितले आहे.

तरीदेखील यंत्र हा मित्र की शत्रू हा प्रश्न माणसाच्या मनात आहेच आणि विचार केला तर त्यास मित्र मानणारे लोक आहेत, कारण यंत्रांचे फायदे व प्रगतीचा ते विचार करतात. यंत्राला काही प्रमाणात शत्रू मानणारे लोक आहेत, कारण यंत्रांनी माणसातील माणुसकी पार हिरावून नेली. केवळ प्रगत व सधन अवस्था प्राप्त करून दिल्याने सर्वच पैशाच्या पाठी लागलेले आहेत.

यंत्रांचा शोध लागल्याने शेतकीसारख्या व्यवसायात माणसाच्या अनाठायी श्रमाला आराम मिळाला व शेती उत्पादन वाढले ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ आहे; पण त्यापुढे प्रत्येक क्षेत्रात यंत्रांचा वापर करण्याचा, उत्पादन वाढण्याचा व धन वृध्दिंगत करण्याचा लोभ वाढल्याने आपण बेकारीला आमंत्रण दिले. भारतासारख्या देशात जेथे लोकसंख्येवर अंकुश नाही तेथे पाश्चात्य देशासारखे आपण यंत्रसज्ज झाल्यावर लोकांना उद्योग काय देणार!

डेविल्स वर्कशॉप यातून चोऱ्या, खून वगैरे प्रकार वाढून माणसाचे जीवन अस्थिर आणि भीतिग्रस्त झाले आहे. बरेच अपघात यंत्रांचा वापर काळजीपूर्वक न केल्याने होतात. कुकर, इस्त्री यातून घडणारे अपघात हे त्याचे उदाहरण आहे. मोठमोठे कारखाने, दवाखाने, प्रयोगशाळा

येथेही अपघात होतात. मोठ्या अपघातांमुळे मनुष्यहानी आणि वित्तहानी होते. यंत्रामुळे उत्पादन वाढले, जीवनात आराम-सौख्य मिळाले हे जरी खरे असले तरी त्याचाही वापर मर्यादित हवा.

नव्या युगात विश्व-स्पर्धेत यशस्वीपणे उभे राहयचे असेल, भारतीय तरूणांना पाश्चात्त्य देशातील नवनवीन गोष्टींचे ज्ञान करून घ्यायचे असेल तर यंत्रांचा उपयोग अनिवार्य आहे. ती पण एक शक्ती आहे. तिची क्षमता अफाट आहे. याचे भान ठेवून त्याचा विकास करणे माणसाच्या हाती आहे, कारण यंत्र हे शक्तिशाली आहे तर मनुष्य बुध्दिमान. बुध्दीच्यामदतीने माणसाने यंत्राचा उपयोग मनुष्यकल्याणासाठी केला तर तो मित्र आहे; पण बॉम्ब तयार करून मनुष्यहानीचाच विचार केला तर यंत्र हा शत्रू आहे निश्चित, असे म्हणावे लागेल

***

